॥ मावळत्या दिनकरा ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः भा. रा. तांबे
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

मावळत्या दिनकरा,
अर्घ्य तुज जोडुनि दोन्ही करां ॥ धृ. ॥

जो तो वंदन करी उगवत्या,
जो तो पाठ फिरवि मावळत्या,
रीत जगाची ही रे सवित्या
स्वार्थपरायणपरा ॥ १ ॥

उपकाराची कुणा आठवण?
"शितें तोंवरी भुतें" अशी म्हण;
जगांत भरलें तोंडपुजेपण,
धरी पाठिवर शरा ॥ २ ॥

असक्त परि तूं केलिस वणवण,
दिलेंस जीवन, हे नारायण,
मनीं न धरिलें सानथोरपण,
समदर्शी तूं खरा ॥ ३ ॥

प्रभु-सचिवा विरहीं मुखधूसर
होति दयामृदु नयनिष्ठुर कर
कारभार टाकुनि चंद्रावर
चाललास तूं खरा ॥ ४ ॥